**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण समिती, नाशिक**
**(अंब्रेला सोसायटी संस्था नोंदणी अधिनियम ,१८६०-**
**नोंदणी क्र .महाराष्ट्र/५३४/२००६/नाशिक.)**

NATIONAL URBAN HEALTH MISSION

**दुरध्वनी क्रमांक :-** ०२५३-२२२२५३२
**ई-मेल आयडी :-** nmcnuhm@gmail.com

**कार्यालय**
सार्वजनिक आरोग्य विभाग, ३ रा मजला, राजीव गांधी भवन, शरणपूररोड, नाशिक ४२२ ००२

NMC/PUBHLTHMED/NUHM/ /2026

जा.क्र./सा.आ.वि./एनयूएचएम/ /२०२६,
दिनांक :- / ०७ /२०२६

# जाहिर नोटीस

राष्ट्रीय आरोग्य अभियान, नाशिक महानगरपालिका अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांचेपैकी 10 वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा पुर्ण केलेल्या कर्मचारी यांचे अंतरीम समायोजन यादी बाबत सुचना

मा आयुक्त,आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रिय आरोग्य अभियान यांचेकडील जाक्र/एनएचएम/ समायोजन आस्था/ 96431-849/2026 दि 23 जुलै 2026 रोजीचे पत्रान्वये मा.दर शासन मार्गदर्शक सुचनांच्या अधिन राहुन राष्ट्रीय आरोग्य अभियान, अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांचेपैकी 10 वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा पुर्ण केलेल्या कर्मचारी यांचे समायोजन यादी प्रसिध्द करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

यानुसार , नाशिक महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत **10** वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा पुर्ण केलेल्या कर्मचारी यांची माहिती तयार करण्यात आलेली आहे. सदर अंतरीम समायोजन यादी , नाशिक महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग, (www.nmc.gov.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतरीम समायोजन यादीमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या नावासमोर नमूद केलेल्या माहितीबाबत आपली काही हरकत असल्यास सोबत जोडलेल्या आक्षेप अर्जामध्ये लेखी स्वरुपात व योग्य त्या पुराव्याचे आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयास दिनांक 31/07/2026 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत या कार्यालयाचे पत्त्यावर (राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कक्ष सार्वजनिक आरोग्य विभाग( नाशिक महानगरपालिक) 3 मजला राजीव गांधी भवन शरनपुर रोड नाशिक) येथे समक्ष येऊन आक्षेप सादर करावेत. पोस्टाने, ईमेलवर किंवा अन्य मार्गाने सादर केलेले आक्षेप अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

योग्य त्या पुराव्यासह विहित कालावधीत आक्षेप नोंदविण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची राहील. याबाबत या कार्यालयामार्फत इतर कोणताही पत्रव्यवहार/ संपर्क केला जाणार नाही. मुदती नंतर प्राप्त आक्षेप स्विकारले जाणार नाहीत. कार्यालयास प्राप्त आक्षेप विचारात घेऊन अंतिम समायोजन यादी व पुढिल सुचना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

sd/-
वैदयकिय आरोग्य अधिकारी
तथा सदस्य सचिव
एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण समिती नाशिक
नाशिक महानगरपालिका नाशिक..

प्रती,
सर्व कंत्राटी अधिकारी /कर्मचारी
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,नाशिक महानगरपालिका नाशिक.